IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

# तत्वचिंतन आणि आत्मानुभूती ह्यांचा मनोहारी मिलाफ-पैस

**डॉ. सुजाता सचिन कुळकर्णी**

**कोकण ज्ञानपीठ**

**कर्जत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कर्जत, रायगड**

**sujatakulkarni60@gmail.com**

एकाचवेळी आल्हाददायक आणि तितकेच धीर-गंभीर तत्वज्ञान, इतिहास, मानववंशशास्त्र, लोककला,धर्मइत्यादी विषयांचा व्यासंग, निखळ निसर्गवर्णन, आत्मानुभूती आणि प्रतिभेचा विलक्षण विलास आशा बहुविधविशेषांचाआविष्कार हे दुर्गा भागवत ह्यांच्या ' पैस' ह्या ललित गद्यलेखन परंपरेतील लेखसंग्रहाचे वर्णन करतायेईल. सदर लेख वाचताना आपण एखादा विषयवाचत आहोत असं वाटतच नाही तर एखाद्या शांत ठिकाणीबसल्यावर दुरून एखादा मंजुळ स्वर कानावर पडल्यावर जसं वाटतं अगदी तीच अनुभूती यावेळी येते.पैस व्यासपर्व, भावमुद्रा ॠतूचक्र ही त्यांची पुस्तके वाचकांसाठी पर्वणीच म्हणता येतील. त्यांची पुस्तकं याचगोष्टीची साक्ष देतात स्वान्तसुखायच लिहिले असावे असे लेख वाचताना जाणवत राहते.

१९७० साली प्रकाशीत झालेल्या ‘पैस ' या पुस्तकासाठी दुर्गा भागवत यांना १९७१ सालचा साहित्यअकादमी पुरस्कार मिळाला.' पैस ' या ललित लेखांच्या संग्रहातील लेख या आधी मौज, साधना, केदार, सत्यकथाइत्यादी मासिकांतून आधी प्रकाशित झालेले होते. दुर्गाबाई भागवत या एक विदुषी म्हणून ओळखल्या जातात.त्यांचे प्रत्येक कार्य सखोलपणे केलेले असते. दुर्गाबाईंच्या प्रदीर्घ प्रस्तावनांमुळेही अनेक वाचकांना त्या परिचित आहेत.'पैस’ या ललित पुस्तकात जे दुर्गाबाईंचे निवडक लेख निवडले आहेत तो एक वेगळाच आस्वाद आहे.कोणताही लेख स्वतंत्र वाचताना एका परिपूर्ण विषयाची कल्पना जशी येते; तशीच सर्व लेखांचे एक समान सूत्रआहे हे देखील जाणवते. ‘भारतीय संस्कृती' ह्या एका धाग्यात सर्व लेख गुंफलेले दिसतात.

**संदर्भ ग्रंथ**

१ पैस,दुर्गा भागवत,मौज प्रकाशन,मुंबई,चवथी आवृत्ती १९९९ पृष्ठ २३,२४

२ तत्रैव पृष्ठ ४३

३ तत्रैव पृष्ठ ४३

४ तत्रैव पृष्ठ ५९